# 'फिनोलेक्स'तर्फे वस्तूवाटप



फिनोलेक्स इंडस्ट्रीज कंपनीच्या मनुष्यबळ विकास शाखा, मुकुल माधव फाउंडेशन आणि लंडन येथील रिचमंड युनिव्हर्सिटीतर्फे विशेष मुलांना व्हिलचेअर आणि कमोड चेअरचे वाटप करण्यात आले.

**पुणे** : फिनोलेक्स इंडस्ट्रीज कंपनीच्या मनुष्यबळ विकास शाखा, मुकुल माधव फाउंडेशन आणि लंडन येथील रिचमंड युनिव्हर्सिटीतर्फे विशेष मुलांना नुकतेच व्हिलचेअर आणि कमोड चेअरचे वाटप करण्यात आले.

फिनोलेक्सचे स्टॅबिस्टियन मोनी आणि फाउंडेशनचे अतुल माने यांच्या हस्ते सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त विद्यार्थ्यांना ३१४ व्हिलचेअर, ३१४ कमोड चेअर आणि शंभर विशेष सुधारित खुर्च्या देण्यात आल्या. रिचमंड युनिव्हर्सिटीने उभारलेल्या निधीतून ही मदत करण्यात आली. माधव मुकुल फाउंडेनशनही १४ व्हिलचेअरच दिल्या. याशिवाय सी. पी. चेअर्स, व्हिलचेअर्स आणि कमोड चेअर्स येत्या वर्षभरात देण्यात येणार आहेत. या प्रकल्पाची ६१ लाख रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

'सातारा जिल्हा परिषदेने सर्वेक्षण सातारा जिल्हा आणि परिसरातील सेरेल्बल पाल्सीग्रस्त ३१४ विद्यार्थी




निश्चित केले होते. या मुलांना शाळेत तसेच घरीही समस्यांना सामना करावा लागतो, अशी माहिती मिळाल्याने आम्ही आम्ही मदतीचा निर्णय घेतला,' असे मुकुल माधव फाउंडेशनच्या विश्वस्त रितू छाब्रिया यांनी सांगितले.

'अनेक विद्यार्थ्यांना शारीरिक विकलांगतेमुळे शाळेपासून दूर राहावे लागते. यावर पर्याय म्हणून सरकारने अपंगांसाठी शिक्षण योजना हाती घेतली आहे. तरीदेखील सेरेब्रल पाल्सी, बहुविध विकलांगता, अस्थिव्यंग समस्या असलेली मुले यापासून दूरच आहेत. त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी हा प्रयत्नशील आहोत,' असे छाब्रिया यांनी सांगितले.